**भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय**
**दंत महाविद्यालय आणि रूग्णालय,पुणे-४३**

**नोटीस**

**दिनांक : २७.०४.२०२१**

सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक यांनी मस्टरवरती स्वाक्षरी करताना खालील सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करावयाचे आहे. रेग्युलर मस्टर, लेट मस्टर, हाफ डे मस्टर, बायोमेट्री या सर्व बाबतीत सर्व स्टाफनी काटेकोरपणे नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. यापुढे याबाबतीत नियमांचे उल्लंघन झाल्यास सदर सेवकास लेखी समज देणेत येईल किंवा त्या-त्या दिवसाची रजा भरून घेणेत येईल याची सर्व सेवकांनी नोंद घ्यावी.

१) अनेक सेवक मस्टरवरती त्यांची पूर्ण स्वाक्षरी करित नाहीत, उलट अन्य प्रकारची /सिंबॉलीक स्वाक्षरी करित आहेत. आपण या महाविद्यालयात सेवेत रूजू होताना कार्यालयीन कागद पत्रावरती जी सही केली आहे तीच सही मस्टरवरती असणे बंधनकारक आहे, वेगळी कोणतीही सही करता येणार नाही अथवा शॉर्ट/अर्धी सही करता येणार नाही.

२) काही सेवक त्यांचे नावासमोरील दोन कॉलम (येताना व जाताना सही असे दोन ) च्या बाहेर इतर सेवकांचे कॉलममध्ये जाईल अशा प्रकारे सहया करित आहेत. अशा सर्वांनी आपल्या नावासमोरील जागेत स्वाक्षरी करावी व इतरांचे कॉलममध्ये आपली स्वाक्षरी जाणार नाही याची काळजी घ्यावी.

३) अनेक सेवक स्वत:च्या नावासमोरील कॉलममध्ये पण मोठी स्वाक्षरी करत असल्याने ती स्वाक्षरी दोन कॉलममध्ये ( दोन तारखांना /कॉलमना) होत आहे. यापुढे ज्या तारखेची आपण सही करित आहात त्याच तारखेच्या कॉलममध्ये आपली सही मर्यादीत असली पाहिजे.

४) या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की अनेक स्टाफ त्यांनी उपभोगलेल्या रजांचे अर्ज या कार्यालयाकडे वेळेवर जमा करित नाहीत. त्यामुळे पगार अदा करताना अडचणी येतात किंवा वारंवार रजा अर्ज मागणी करावी लागते. त्यामुळे पूर्ण रजा मंजूरी शिवाय कोणीही रजा घेऊ नये व रजांचे अर्ज त्वरीत या कार्यालयाकडे जमा करावेत.

५) काही सेवक दोन वेगवेगळया रजा एकत्र जोडून घेत आहेत.नियमानुसार कोणतीही एक प्रकारची रजा एकावेळी घेणे आवश्यक आहे. परंतू रविवार व अन्य सुट्टीचे दिवस रजेतून वाचविण्यासाठी अनेक स्टाफ अशा वेगवेगळया रजा जोडून घेत असल्याचे निदर्शनास येत आहे. यापुढे अशा प्रकारे रजा घेता येणार नाहीत याची नोंद घ्यावी. आपण आपल्या रजांचे नियोजन योग्यप्रकारे केल्यास आपणास अशा दोन रजा एकत्र जोडून घेण्याची आवश्यकता भासणार नाही.

६) काही स्टाफ मस्टरवरती स्केचपेन व स्पार्कल पेननी सहया करित आहेत. यापुढे सर्वांनी फक्त निळा बॉल पेननी स्वाक्षरी करावयाची आहेत. इतर कोणत्याही प्रकारे सही करता येणार नाही.

**प्राचार्य**

प्राचार्य
भारती विद्यापीठ
(अभिमत विश्वविद्यालय)
दंत महाविद्यालय व रूग्णालय
पुणे-सातारा रोड, पुणे-४११०४३.